मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | बुधवार, दि. 03 जून 2026 | पान- 1

# भाजपच्या किरीट सोमय्यांची पिंपरी-चिंचवड महापालिकेत अचानक भेट

## महापौर रवी लांडगेंची घेतली भेट, विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भेटीला राजकीय अर्थ?



**पिंपरी | प्रतिनिधी**

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष किरिट सोमय्या यांनी आज मंगळवारी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला दिलेल्या अचानक भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

महापौर रवी लांडगे यांची त्यांनी भेट घेतली असून त्याआधी काही वेळ त्यांनी आयुक्तांकडून जन्म-मृत्यू नोंदणी विभागासंदर्भातील विषयांवर आढावा घेतल्याची माहिती समोर येत आहे.

महापालिकेतील जन्म व मृत्यू दाखल्यांच्या नोंदी, पडताळणी प्रक्रिया, तसेच बनावट दाखल्यांबाबत राज्यभर सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर सोमय्या यांनी आयुक्तांकडून माहिती घेतल्याचे सांगितले जात असले तरी या भेटीमागे केवळ प्रशासकीय कारण नसून राजकीय संकेतही दडले असल्याची चर्चा शहरातील राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

विशेष म्हणजे सध्या विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून कालच पुणे विधानपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे सोमय्या हे पक्षश्रेष्ठींचे काही विशेष संदेश किंवा आदेश घेऊन आले होते का, याबाबतही तर्कवितर्क लावले जात आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सत्तासमीकरणे, आगामी राजकीय घडामोडी आणि विधानपरिषद निवडणुकीतील रणनीती या पार्श्वभूमीवर या भेटीकडे राजकीय नजरेने पाहिले जात आहे. भाजपच्या स्थानिक पातळीवरील संघटनात्मक हालचाली आणि निवडणुकीपूर्वीची अंतर्गत तयारी याचाही या भेटीशी संबंध जोडला जात आहे.

दरम्यान, या भेटीनंतर अधिकृतरीत्या कोणतेही निवेदन देण्यात आले नसले तरी राजकीय चर्चांना मात्र चांगलेच उधाण आले आहे.

# सोशल मीडियावरील जनगणनेच्या अफवांपासून सावध राहा : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

## जनगणना प्रक्रिया पूर्णतः डिजिटल आणि पारदर्शक; नागरिकांना अपप्रचाराला बळी न पडण्याचे आवाहन




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात सुरू असलेल्या 'जनगणना २०२७'च्या घरसूचीकरण व घरगणना सर्वेक्षणासंदर्भात सोशल मीडियावर दिशाभूल करणारे संदेश, अफवा आणि अप्रमाणित माहिती प्रसारित होत असल्याने नागरिकांनी अशा अपप्रचारावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने केले आहे. जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया ही अधिकृत, पारदर्शक आणि पूर्णतः डिजिटल पद्धतीने राबविली जात असून, कोणत्याही खोट्या माहितीस बळी पडू नये, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले आहे.

सोशल मीडियावर जनगणना प्रक्रियेबाबत विविध प्रकारची अप्रमाणित माहिती आणि खोटी संकेतस्थळे प्रसारित होत असून, त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

महापालिकेने नियुक्त केलेल्या अधिकृत प्रगणक आणि पर्यवेक्षक यांच्या माध्यमातूनच जनगणनेचे काम सुरू आहे. या प्रक्रियेत कोणत्याही कागदी फॉर्मचा वापर न करता मोबाईलवरील अधिकृत 'एचएलओ ॲप 'द्वारे ऑनलाइन स्वरूपात माहिती नोंदविली जात असल्याचे शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

महापालिकेच्या माहितीनुसार, 'जनगणना २०२७'च्या पहिल्या टप्प्यातील घरसूचीकरण व घरगणनेच्या प्रत्यक्ष कामास १६ मे २०२६ पासून सुरुवात झाली असून, ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. एचएलओ ॲपच्या माध्यमातून घरांचे सर्वेक्षण यशस्वीपणे पूर्ण करण्यात येत असून, ही प्रक्रिया सुरक्षित, अचूक आणि पूर्णतः डिजिटल स्वरूपात राबविली जात असल्याचेही शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी नमूद केले.

प्रशासनाने नागरिकांना खोट्या संकेतस्थळांपासून आणि सोशल मीडियावरील अफवांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. अचूक जनगणना ही शहर विकासाची भक्कम पायाभरणी असून, शाळा, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते आणि इतर नागरी सेवांचे नियोजन अचूक माहितीच्या आधारेच प्रभावीपणे करता येते, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

जनगणना अधिकारी केवळ आवश्यक माहिती नोंदवतात. ते कोणतेही आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा इतर सरकारी कागदपत्र, बँक तपशील अथवा मोबाईल ओटीपी मागत नाहीत. नागरिकांनी दिलेली सर्व माहिती सुरक्षित आणि गोपनीय राखली जाते. त्यामुळे जनगणना कर्मचाऱ्यांना आवश्यक सहकार्य करून शहर विकासाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

> **सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अप्रमाणित माहिती, अफवा किंवा दिशाभूल करणाऱ्या संदेशांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी केवळ अधिकृत जनगणना कर्मचाऱ्यांनाच सहकार्य करावे. संपूर्ण जनगणना प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि डिजिटल स्वरूपात 'एचएलओ ॲप 'च्या माध्यमातून राबविली जात असून नागरिकांनी विश्वासाने आणि जबाबदारीने आपला सहभाग नोंदवावा.""**
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> **जनगणना २०२७ अंतर्गत माहिती संकलनाचे काम 'एचएलओ ॲप 'च्या माध्यमातून अधिकृत प्रगणक आणि पर्यवेक्षकांमार्फत पूर्णतः ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने सुरू आहे. नागरिकांनी सोशल मीडियावरील अफवा किंवा अपप्रचारावर विश्वास न ठेवता अधिकृत जनगणना कर्मचाऱ्यांनाच सहकार्य करावे. जनगणना अधिकारी कोणतेही कागदपत्र, बँक तपशील किंवा मोबाईल ओटीपी मागत नाहीत.**
>
> **- सचिन पवार, उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# "भ्रष्टाचाराची प्रवृत्तींचा कर्दनकाळ" म्हणजे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे!

## 60 कोटी रुपयांच्या कथित बोगस उपसूचना प्रकरणात वादग्रस्त अधिकारी प्रवीण जैन यांची उचलबांगडी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सुमारे ६० कोटी रुपयांच्या बोगस उपसूचना घोटाळा प्रकरणात अखेर मोठी प्रशासकीय कारवाई झाली आहे. या प्रकरणात मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांची राज्य सरकारने बदली केली असून, त्यांच्याजागी नवी मुंबई महापालिकेचे मुख्य लेखा अधिकारी सत्यवान उबाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयामुळे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आल्याचे मानले जात आहे.



बोगस उपसूचना घोटाळा प्रकरण उघडकीस आल्यानंतर सभापती अभिषेक बारणे यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करत, नियमबाह्य पद्धतीने सुमारे ६० कोटी रुपयांच्या फाइल्स मंजूर करून विशिष्ट कंत्राटदारांना आर्थिक फायदा पोहोचवण्यात आल्याचा ठपका ठेवला होता. त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी सातत्याने लावून धरली होती.

या प्रकरणाची प्राथमिक चौकशी मंत्रालय आणि महापालिका स्तरावर करण्यात आली. त्यानंतर सादर झालेल्या अहवालानंतर आणि वाढत्या राजकीय-प्रशासकीय दबावाच्या पार्श्वभूमीवर प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले होते. अखेर राज्य शासनाच्या वित्त विभागाने २९ मे रोजी आदेश जारी करत त्यांची बदली केली.

दरम्यान, या प्रकरणावर फक्त बदली पुरेशी आहे का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. सुमारे ६० कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराची रक्कम, जबाबदार लोकप्रतिनिधींची भूमिका आणि आर्थिक वसुली याबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे पुढील टप्प्यात या प्रकरणात आणखी कोणावर कारवाई होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या घडामोडीमुळे महापालिकेतील प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, बारणे यांच्या भूमिकेचे समर्थन करणाऱ्यांकडून हा निर्णय "लढ्याचे यश" म्हणून पाहिला जात आहे. विशेष म्हणजे, या कारवाईनंतर बारणेंप्रति प्रशासकीय यंत्रणांमध्ये प्रचंड 'स्ट्राँग मॅसेज' गेला आहे. भाजपाचे स्थानिक नेते, आमदार किंवा पदाधिकारी यांनी फारसा हस्तक्षेप न करताही हा विषय महापालिका आणि प्रशासकीय पातळीवर सक्षमपणे हाताळण्यात बारणेंना यश मिळाले आहे. सोबतच पक्षाची प्रतिमा न डागाळता चुकीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना धडा शिकवल्यामुळे "भ्रष्टाचाराची प्रवृत्तींचा कर्दनकाळ" म्हणून बारणे यांनी स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

### प्रशासकीय मुत्सद्देगिरीची चुणूक....

» वास्तविक, बोगस उपसूचना प्रकरणाला वाचा फोडण्याची भूमिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी घेतली. मात्र, विरोधी पक्षातील राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या नगरसेवकांनी हा विषय सत्ताधारी भाजपावर शेकवण्याचा प्रयत्न केला. चौफेर टीका करुन आता प्रकरण भाजपाच्याच अंगलट येणार, असे चित्र निर्माण झाले होते. राज्यातील पक्षश्रेष्ठींकडून माहिती मागवली होती. स्थानिक पातळीवरील हा मुद्दा राज्यातील प्रमुख नेत्यांच्या चर्चेत आला होता. त्यामुळे भाजपाला 'डॅमेज' करण्याची संधी विरोधी बाकावरील नेत्यांनी शोधली होती. मात्र, सभागृहात अवघ्या एका टर्मचा अनुभव असलेले अभिषेक बारणे यांनी स्थायी समिती सभापती म्हणून पक्षाची प्रतिमा आणि प्रशासकीय अनागोंदी दोन्हींवर संयमाने प्रहार कायम ठेवला. त्यामुळे चौकशी समिती बसवण्यात आली आणि वादग्रस्त अधिकाऱ्यावर उचलबांगडीची कारवाईसुद्धा करण्यात आली. त्यामुळे स्थायी समिती सभापती म्हणून अभिषेक बारणे यांनी प्रशासकीय मुत्सद्देगिरीची चुणूक दाखवली आहे.

# कशिश प्राईड-अमृतवेल सोसायटी परिसरातील नागरिकांना दिलासा!

## ड्रेनेज ओव्हरफ्लो समस्या अखेर मार्गी, महापालिकेची कार्यवाही, शहर सुधारणा समिती सदस्य डॉ. सुहास कांबळे यांचा पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

कशिश प्राईड आणि अमृतवेल सोसायटी परिसरातील दीर्घकाळ प्रलंबित असलेली ड्रेनेज ओव्हरफ्लोची समस्या अखेर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या (मनपा) तातडीच्या कारवाईनंतर सोडवण्यात आली आहे.




सेक्टर क्रमांक ४ मधील कशिश प्राईड-अमृतवेल सोसायटीलगत असलेल्या मोकळ्या प्लॉटमध्ये मुख्य ड्रेनेज चेंबरमधून सातत्याने सांडपाणी बाहेर पडत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. साचलेल्या पाण्यामुळे डासांची पैदास वाढून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाल्याची तक्रार स्थानिक रहिवाशांनी केली होती.

ही बाब स्थानिक रहिवाशांनी शहर सुधारणा समितीचे सदस्य तथा नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने मनपा प्रशासनाशी संपर्क साधत उपाययोजना करण्याची मागणी केली. त्यानंतर मनपाच्या जलनि:सारण आणि आरोग्य विभागाने घटनास्थळी जेटींग कम सक्शन मशीन पाठवून तातडीने काम सुरू केले.

> "कशिश प्राईड-अमृतवेल सोसायटी परिसरातील ड्रेनेज समस्येबाबत नागरिकांनी तत्काळ आमच्याशी संपर्क साधल्यानंतर आम्ही तातडीने मनपा प्रशासनाशी समन्वय साधला. नागरिकांचे आरोग्य आणि परिसराची स्वच्छता ही आमची सर्वोच्च जबाबदारी असून, अशा समस्या भविष्यात पुन्हा निर्माण होऊ नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यावर आमचा भर आहे."
>
> - डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक तथा सदस्य, शहर सुधारणा समिती.

या कारवाईदरम्यान ड्रेनेज लाईनमधील गाळ व कचरा काढून साफसफाई करण्यात आली, ओव्हरफ्लो होत असलेल्या चेंबरची दुरुस्ती करण्यात आली तसेच परिसरात निर्जंतुकीकरणाची प्रक्रिया राबवण्यात आली.

कारवाईनंतर परिसरातील सांडपाण्याचा निचरा सुरळीत झाला असून दुर्गंधी आणि आरोग्यधोका कमी झाल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. दरम्यान, भविष्यात अशी समस्या उद्भवू नये यासाठी नियमित देखभाल करण्याची मागणी रहिवाशांकडून करण्यात येत आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये अवैध दारूअड्ड्यांवर छापासत्र सुरूच

## तेवीस ठिकाणी अवैध दारूअड्ड्यांवर कारवाई, मुद्देमाल जप्त करून गुन्हे दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील अवैध दारू अड्डे व दारू भट्ट्यांवर रविवारी एकच दिवसात २३ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत मुद्देमाल जप्त करून संबंधितांवर गुन्हे दाखल केले आहे.मोशीतील तुपेनगर येथील कारवाईत साडेसहा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून मानसी कंजारभाट हिच्यावर भोसरी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. आळंदी फाटा येथील गवते वस्ती येथे मनीषा राठोड हिने विक्रीसाठी १४० लिटर दारू जवळ बाळगली. तिच्यावर आळंदी ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

आळंदी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विकासवाडी येथे केलेल्या कारवाईत पिंटू नट याच्याकडून चार हजार ८०० दारू जप्त केली. मेदनकरवाडी केलेल्या कारवाईत फुलवंती राठोड ही दारू विक्री करताना आढळली. ही दारू तिला सावित्रा राठोड ही आणून देत होती. या दोघींवर गुन्हे दाखल झाले आहे. एमआयडीसी भोसरी येथे केलेल्या कारवाईत राजू भंडारी याने त्याचा मालक श्याम मेदनकर याच्या सांगण्यावरून त्याच्याकडे साडेतीन हजार रुपये किमतीची ताडी विक्रीसाठी जवळ बाळगली. या दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे.ॉ

तसेच चिंचवड येथील दळवीनगर झोपडपट्टीत केलेल्या कारवाईत एका खोलीत चार हजार रुपये किमतीची गावठी दारू विक्रीसाठी ठेवल्याचे आढळले. यात एकावर गुन्हा दाखल केला आहे. पुनावळे येथील रानजत्रा हॉटेलमधून तीन हजारांची दारू जप्त करून शहाजी ढगे याच्यावर गुन्हा दाखल झाला. देहूतील विठलवाडी येथे गावठी दारू विकणाऱ्या सलोनी राठोड हिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. सहा हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मोशीतील खडी मशीन रस्ता येथील कारवाईत हर्ष करणसिंग गुज्जर हा विनापरवाना दारू विकताना आढळला.



कोयाळी गावच्या हद्दीतील भिवरेवाडी येथे दारूभट्टीवर छापा टाकून अकराशे लिटर ५५ हजार रुपये किमतीचे रसायन नष्ट केले. यात गोपाळ मनावत याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आली. नाणेकरवाडी येथील ठाकरवस्ती येथे कारवाई करण्यात आली. येथेही अकराशे लिटर ५५ हजार रुपये किमतीचे रसायन नष्ट केले. या कारवाईत समाधान भगवान जेवलेवाड, प्रसाद गाडेकर व शेखर केळकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आली. कुरुळी येथील हॉटेल धनश्री येथून १० हजार रुपयांचा दारूचा माल जप्त केला असून, दादा तोडमल याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आली. खराबवाडी येथील कारवाईत कुणाल दडस व विकी खराबे यांच्यावर गुन्हा दाखल केला असून ते विनापरवाना दारू विक्री करताना आढळले. मुळशीतील कासारसाई येथे लक्ष्मी राठोड हिच्याकडून सहा हजार ८०० रुपयांची दारू जप्त केली. तर पिंपळे गुरव येथील शिवरामनगर येथे बेकायदा दारू विक्री केल्याप्रकरणी योगिता गोयल हिच्यावर गुन्हा दाखल झाला.

पिंपरीतील रामनगर येथे केलेल्या कारवाईत सुनील शिंदे याच्यावर गुन्हा दाखल झाला. तो गावठी दारू विक्री करताना आढळला. पिंपरीतील भाटनगर येथील बिल्डिंग क्रमांक पाच मधील चौथ्या मजल्यावरील एका खोलीत विक्रीसाठी हातभट्टी दारूचा साठा करून ठेवणाऱ्या निशा भाट हिच्यावर गुन्हा दाखल झाला असून तीन हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. बिल्डिंग क्रमांक सहा मधील चौथ्या मजल्यावरील एका खोलीत वर्षा भाट व तुलसी रावळकर यांनी गावठी दारू तयार करण्याचे रसायन, नवसागर, गूळ हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी साठवून ठेवल्याचे आढळले. या दोघींवर गुन्हा दाखल झाला आहे. तर संजय गांधीनगर पत्रा शेडमध्ये हातभट्टीची दारू विक्रीसाठी ठेवल्याचे आढळले. या कारवाईत सुनीता चेलानी हिच्यावर गुन्हा दाखल केला आहे

# कोकणे चौक ते स्वराज चौक परिसरात अपघातांची मालिका सुरूच...

## कायमस्वरूपी वाहतूक पोलीसाची नेमणूक करा; अन्यथा आंदोलनाच पर्याय, नगरसेविका सौ. अनिताताई संदीप काटे यांचा वाहतूक विभागाला इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथील कोकणे चौक ते स्वराज चौक या परिसरात वारंवार होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर कायमस्वरूपी वाहतूक पोलीस नेमावेत, अशी मागणी प्रभाग क्रमांक २८ च्या नगरसेविका सौ. अनिताताई संदीप काटे यांनी पुन्हा एकदा वाहतूक पोलिसांकडे केली आहे. तसेच निष्पाप नागरिकांच्या जीवाचा अजून किती दिवस खेळ करणार आहात?, असा संतप्त केला आहे. लवकरात लवकर येथे वाहतूक पोलिसंची नेमणूक न केल्यास आंदोलनाचा इशारा त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे वाहतूक विभागाला दिला आहे.

पत्रकात त्यांनी म्हटले आहे कि, पिंपळे सौदागर, कोकणे चौक, पीके चौक आणि स्वराज चौक हा परिसर सध्या मोठ्या प्रमाणात विकसित झाला असून येथे निवासी संकुले, व्यावसायिक इमारती, शाळा, महाविद्यालये आणि आयटी कार्यालयांची संख्या मोठी आहे. त्यामुळे दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. मात्र, त्यानुसार वाहतूक नियंत्रण व्यवस्था मजबूत करण्यात आलेली नाही. परिणामी या परिसरात सतत अपघात घडत आहेत. त्याकडे वाहतूक पोलीस दुर्लक्ष करीत आहे. या मार्गावर अपघात नित्याचेच झाले आहेत. अनेकवेळा वाहतूक विभाग आणि प्रशासनाकडे लेखी तसेच प्रत्यक्ष पाठपुरावा करूनही



काही दिवसांकरिता केवळ दिखावूपणासाठी वाहतूक पोलीस नेमले जातात. त्यानंतर तिथून वाहतूक पोलीस गायब होतात मग पुन्हा सुरु होते 'येरे माझ्या मागल्या'.

दरम्यान, शनिवारी दुपारी दीडच्या सुमारास येथील पीके चौकातील बीआरटी मार्गावर दुचाकी आणि कारचा भीषण अपघात झाला. भरधाव वेगातील कार आणि दुचाकीची जोरदार धडक झाल्याने दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघातात दुचाकीस्वार तसेच कार चालक गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. नियम डावलून बीआरटीत सर्रास वाहने घुसखोरी करतात. तशात तिथे नियंत्रणासाठी वाहतूक पोलीस अथवा वार्डन नसतात. वेगाने धावणारी वाहने आणि कायमस्वरूपी वाहतूक पोलिसांचा अभाव यामुळे या परिसरात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः सकाळी आणि सायंकाळी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी वाहतूक पोलीस नेमून चौकांमध्ये कडक वाहतूक नियंत्रण करावे, स्पीड नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात तसेच अपघातप्रवण ठिकाणांचा स्वतंत्र आढावा घ्यावा. अन्यथा स्थानिक नगरसेवकांसह नागरिकांसाठी आंदोलन छेडण्यात येईल, असे पत्रकात म्हटले आहे.

# पुण्यात सध्या पाणीकपात नाही; मात्र महापालिकेकडून भविष्यासाठी नियोजन सुरू

## धरणांमध्ये गेल्या वर्षीपेक्षा अधिक पाणीसाठा; कमी पावसाच्या अंदाजामुळे पाणीवापरावर नियंत्रणाचा पर्याय विचाराधीन

**पुणे | प्रतिनिधी**

उन्हाळा वाढत असल्याने नागरिकांकडून पाण्याची मागणी वाढत चालली आहे. त्यातच यंदाच्या वर्षी कमी पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे धरणातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करून हे पाणी अधिक दिवस कसे वापरता येईल, याची चाचपणी करण्यास महापालिका प्रशासनाने सुरुवात केली आहे. कडक उन्हाळ्यामुळे बाष्पीभवन होऊन पाणी कमी होत आहे.

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या साखळीत गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी अर्धा दशलक्ष घनफूट (टीएमसी) पाणीसाठा अधिक शिल्लक असल्यामुळे शहरात तूर्तास पाणीकपात होणार नसली, तरी हवामान खात्याचा अंदाज लक्षात घेऊन पुढील नियोजन केले जाईल, असे पुणे महापालिकेतील अधिकाऱ्यांनी सांगितले.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांत गेल्या वर्षी १ जून रोजी ५.६४ टीएमसी पाणी शिल्लक होते. तर, यंदा हा साठा ६ टीएमसी आहे. त्यामुळे शहरात सध्या तरी पाणीकपात होणार नाही. मात्र, धरणांमध्ये सध्या उपलब्ध असलेला पाणीसाठा अधिक काळ टिकवण्यासाठी पाणीकपातीचा पर्याय गांभीर्याने विचाराधीन असल्याचे संकेत महापालिका प्रशासनाकडून देण्यात येत आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये वाढलेले शहरीकरण, गगनचुंबी इमारतींचे वाढत असलेले जाळे, दर वर्षी वाढणारी लोकसंख्या आणि त्या तुलनेत न वाढणारे जलस्रोत यामुळे पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. मात्र, वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्ध पाणीसाठा आणि वापर यामधील ताळमेळ बिघडत चालला आहे. शहराची पाण्याची गरज दरमहा सुमारे १.५ ते १.६५ टीएमसी इतकी आहे. यंदा 'एल निनो'च्या संभाव्य परिणामांमुळे पाऊस कमी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.




### वाढत्या लोकसंख्येमुळे पाणीपुरवठ्यावर ताण

» पुण्यात वाढते शहरीकरण, गगनचुंबी इमारती आणि वाढती लोकसंख्या यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. शहराची दरमहा पाण्याची गरज सुमारे १.५ ते १.६५ टीएमसी इतकी आहे. काही भागांमध्ये पाणीपुरवठ्याच्या अडचणी निर्माण झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यंदा टँकरची मागणी सुमारे ५० ने वाढल्याचे महापालिकेने सांगितले. उपलब्ध जलस्रोत आणि वाढती मागणी यांचा समतोल राखण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

### धरणांत सध्या समाधानकारक पाणीसाठा

» पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणसाखळीत यंदा ६ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी १ जून रोजी हा साठा ५.६४ टीएमसी इतका होता. त्यामुळे सध्या शहरात पाणीकपातीची गरज नसल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मात्र वाढत्या उन्हामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढत असून उपलब्ध पाणी अधिक काळ टिकवण्यासाठी नियोजन केले जात आहे. धरणांतील पाणीसाठ्याचा नियमित आढावा घेतला जात असून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुरू ठेवण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

### कमी पावसाच्या शक्यतेने प्रशासन सतर्क

» हवामान खात्याने यंदा पाऊस कमी पडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. 'एल निनो'च्या संभाव्य परिणामांमुळे मान्सूनवर परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. ही बाब लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने महापालिकेला पाणीवापरावर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना केल्या आहेत. धरणांतील उपलब्ध पाणी ऑगस्टपर्यंत पुरेल, यासाठी पर्यायी उपाययोजनांचा विचार सुरू आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात पर्जन्यमान, हवामानाचा अंदाज आणि धरणसाठ्याचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेतला जाणार आहे

# शहरातील वाढत्या गुन्हेगारीवरून पोलीस आयुक्तांच्या उचलबांगडीची मागणी...

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे कार्याध्यक्ष इंजि. देवेंद्र तायडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती गुन्हेगारी, ढासळलेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती आणि अपुऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर विद्यमान पोलीस आयुक्तांची तात्काळ उचलबांगडी करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे कार्याध्यक्ष इंजि. देवेंद्र तायडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात तायडे यांनी मुख्यमंत्री यांना सविस्तर निवेदन दिले असून, शहरातील गंभीर कायदा व सुव्यवस्था प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे. पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक, शैक्षणिक व रोजगाराचे महत्त्वाचे केंद्र असतानाही गेल्या काही महिन्यांत शहरात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



विषारी दारू प्रकरण, खून, महिलांवरील अत्याचार, छेडछाड, टोळीगिरी, खंडणी, गोळीबार, वाहनांची तोडफोड, मादक पदार्थांची विक्री तसेच संघटित गुन्हेगारीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. चिंचवड, संत तुकाराम नगर, देहूरोड, पिंपरी, निगडी आणि भोसरी परिसरात खुलेआम बेकायदेशीर प्रकार सुरू असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर खुलेआम सुरू असलेला देहविक्रीचा व्यवसाय, अवैध गुटखा विक्री, मटका, लॉटरी व इतर अवैध धंद्यांवर पोलीस प्रशासन प्रभावी नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये असल्याचे तायडे यांनी म्हटले आहे.

तायडे यांनी शहरातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीची उच्चस्तरीय चौकशी, विशेष तपास पथकाची नियुक्ती, संवेदनशील भागांमध्ये विशेष मोहीम आणि अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

"पिंपरी-चिंचवड शहराची प्रतिमा दिवसेंदिवस मलिन होत आहे. नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती उरलेली नाही. त्यामुळे विद्यमान पोलीस आयुक्तांची तात्काळ उचलबांगडी करून सक्षम व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची नियुक्ती करावी," अशी मागणी इंजि. देवेंद्र तायडे यांनी केली.